**महाराष्ट्र विधानपरिषद**

**पत्रक भाग दोन**

**मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६/ फाल्गुन ५, १९४७ (शके)**

**१९. मा.राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सुधारणा मांडण्याबाबत.**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सर्व सदस्यांना निदेशानुसार कळविण्यात येते की, विधानमंडळाच्या उभय सभागृहांच्या सदस्यांपुढे सोमवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०२६ रोजी झालेल्या मा.राज्यपालांच्या अभिभाषणावर आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर मंगळवार, दिनांक २४ व बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी चर्चा होणार आहे. आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावास सदस्यांना सुधारणा मांडावयाच्या असल्यास आज मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत **GAIS** या संगणक प्रणालीवर संपूर्णत: ऑनलाईन **(Online)** पध्दतीने देण्यात याव्यात. तसेच विहित वेळेत प्राप्त न झालेल्या किंवा ऑफलाईन पद्धतीने प्राप्त होणाऱ्या सूचना कार्यवाहीतून वगळण्यात येतील. आभार प्रदर्शन प्रस्तावास सदस्यांकडून देण्यात येणाऱ्या सुधारणांच्या पुस्तिकेचे वितरण सन्मा.सदस्यांना बुधवार, दिनांक २५ फेब्रुवारी, २०२६ रोजी त्यांच्यासाठी राखीव असलेल्या टपालखणाद्वारे करण्यात येईल.

निदेशानुसार असेही कळविण्यात येते की, म.वि.प. नियम ५९ मधील परंतुकानुसार कोणत्याही सदस्याला अशा सुधारणांच्या दहा पेक्षा जास्त सूचना देता येणार नाहीत.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२६.

**डॉ.विलास आठवले**
सचिव-३
महाराष्ट्र विधानपरिषद.

**प्रती :-**

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सदस्य.
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
३. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.
४. सचिव-३, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक.
५. सचिव-४, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे स्वीय सहाय्यक.
६. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
७. प्रधान सचिव, संसदीय कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
९. संगणक कक्ष, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.



Scanned with OKEN Scanner